# मार्च २०२४ चे राशी भविष्य- माघ मासात कृष्णपक्ष आणि फाल्गुन मासात शुक्ल पक्ष

लेखक-अजय तनखीवाले

पाश्वर्भूमी :



**उत्सव**: महा शिवरात्री-१८ मार्च, होळी आणि वसंत पंचमी- २४, २५ मार्च.

मार्च मधील **महत्वाच्या तारखा**: पौर्णिमा - २५ मार्च ला आहे, अमावस्या १० मार्च रोजी, एकादशी २० मार्च रोजी. फाल्गुन मास ११ मार्च रोजी सुरू होतो.

महिन्यातील गोचर **ग्रह युती**: १. मकरेत मंगल, प्लुटो. २. कुंभेत शनी, रवी. ३. गुरु, हर्षल मेषेत. ४. राहू, नेपच्यून, बुध मीन मध्ये. ५. केतू कन्या राशीत आहे.

## १.२ – १ मार्च रोजीची कुंडली व १७ मार्चची कुंडली

**१ मार्च ची कुंडली**




**१७ मार्च ची कुंडली**




## २.०: **भविष्य**-चंद्र राशी प्रमाणे: (आपल्या चंद्र राशी (भारतीय पध्दती) प्रमाणे वाचा)

| राशी | भविष्य |
|---|---|
| **२. १ मेष राशी (Mesh):**<br><br> | • *<u>अ. स्वास्थ्य</u>*<br>  • गुरु, हर्षल मार्गी लागल्यामुळे, स्वास्थ्य फारच सुधारेल.<br>  • नवीन टेकनॉलॉजी वापरून डॉक्टर क्लीन चिट देतील.<br>  • पण शष्ठमात केतू काही वाढत्या वयाच्या रोगाची नांदी देईल.<br>  • बारावा राहू स्वास्थाबद्दल अनपेक्षित घटना घडवतो.<br>• *<u>ब . नोकरी/धंदा</u>*<br>  • कामावर पुढाकार घ्याल आणि प्रभुत्व मिळवाल.<br>• *<u>क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे</u>*<br>  • गुरूची दृष्टी असल्यामुळे जोडीदारावर प्रेम वाढेल.<br>  • शनीची दृष्टी काही आर्थिक प्रश्न पुढे आणतो.<br>• *<u>ड . वित्त/ गुंतवणुकी</u>*<br>  • रवी मोठ्या गुंतवणुकी करवेल.<br>  • शनी उत्तम घडामोडी घडवतो आणी अमाप संपत्ती गोळा करतो.<br>• *<u>इ . कौटुंबिक</u>*<br>  • आई बाबांची तब्येत सांभाळा. थोडा त्रास सहन करावा लागेल.<br>  • मुलं मात्र परीक्षांमध्ये  उत्तम कामगिरी करतील.<br>• *<u>फ . परदेश गमन</u>*<br>  • गुरू किंवा मोठे बंधू परदेश गमनास कारणीभूत होतील. |
| **२.२ वृषभराशी (Vrishabha):**<br><br> | • *<u>अ. स्वास्थ्य</u>*<br>  • या मासात स्वास्थ्य छान असेल.<br>  • स्थूलपणा कमी करावा. डॉक्टर फायदेशीर नवीन औषध दीर्घ काळासाठी देतील. ते घ्यावे.<br>• *<u>ब . नोकरी/धंदा</u>*<br>  • कामावर जम बसवाल. भरपूर प्रसिद्धी मिळवाल.<br>  • स्वतंत्र व्यवसायिक उपक्रम यशस्वी होईल.<br>  • ऑफिस मधील स्त्रियांची साथ मिळेल.<br>• *<u>क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे</u>*<br>  • शनीच्या साथीने उत्तम कौटुंबिक जीवनाचा अनुभव येईल.<br>  • यंदा विवाह योग आहेत.<br>• *<u>ड . वित्त/ गुंतवणुकी</u>*<br>  • लाभदायक गुंतवणुकी होतील. |

| | |
|---|---|
| | ○ नवीन उद्योग सुरू करायला जागा मिलेल.<br>• *इ . कौटुंबिक*<br>○ भाऊ बहिणी मध्ये कलह टाळा.<br>○ आईची चिंता करू नये.<br>○ शिक्षक व कोचिंग क्लास मुलांना सोयीस्कर ठरतील.<br>• *फ . परदेश गमन*<br>○ बरेच वेळा, या देशात संधीसाधू बनाव लागत.<br>○ परदेश गमनाच्या उत्तम संधी येतील. |
| **२.3 मिथुन राशी (Mithun):**<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>• पूर्वार्धात अपघात टाळा.<br>○ बाकी स्वास्थ्य उत्तम असेल.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>○ नोकरी सांभाळा, कोण कुटिल कारस्थानी आहे यावर बारीक लक्ष असू देत. आपल्या कौशल्याने मार्ग काढाल.<br>○ औषधी आणि फार्माचे उद्योगात भरघोस यश मिळेल.<br>○ तुम्हाला मोठा प्रोजेक्ट मिळेल. व्यावसायिक वसुली होईल.<br>• *क . वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>○ वैवाहिक जीवनात रंजकता येईल.<br>○ पती पत्नी एकमेकांना छान साथ देतील.<br>○ पौर्णिमा पर्यटनाची असेल.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>○ तुमचे सल्लागार उत्तम गुंतवणूक करून देतील.<br>○ खाद्य पदार्थांच्या निर्मिती कंपन्या आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणाऱ्या कंपन्या गुंतवणुकीस उत्तम.<br>• *इ . कौटुंबिक*<br>○ आईची प्रकृती नाजूक असण्याची शक्यता.<br>○ पूर्वार्धात भावंडे एकत्र याल. मुलं उत्तम कामगिरी करतील.<br>• *फ . परदेश गमन*<br>○ परदेशाशी व्यापारात भरभराट येईल.<br>○ परदेशगमनाची दाट शक्यता.<br>○ जोडप्याने शिवरात्रीचे अहोरात्र जागरणाचे प्रयत्न करा. |
| **२.४ कर्क राशी (Karka):** | • *अ. स्वास्थ्य*<br>• पूर्वार्धात अपघाता पासून स्वत:ला वाचवा. |

| | |
|---|---|
| <br> | ○ व्याधींचा त्रास जाणवेल.<br>• *<u>ब . नोकरी/धंदा</u>*<br>○ तुम्ही शिक्षक उर्फ मार्गदर्शक आहात आणि  ए. आय. सारखे नवीन तंत्रज्ञान वापरता. नोकरीत याचा मोठा लाभ होईल.<br>○ दूरदृष्टीने बरेच फायदे होणार.<br>○ व्यावसायिक चढाओढी होणारच पण त्यातही तुमचा भाग्योदय होईल.<br>• *<u>क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे</u>*<br>○ शिवरात्रीला जोडीदारासोबत उपवास करावा.<br>○ पूर्वार्ध थोडा कलहाचा. उत्तरार्ध मात्र उत्तम जाईल.<br>• *<u>ड . वित्त/ गुंतवणुकी</u>*<br>○ फारशा  गुंतवणुकी होणार नाही. जमीन जुमला व्यापार होण्याची शक्यता कमीच आहे.<br>• *<u>इ . कौटुंबिक</u>*<br>○ कौटुंबिक मंडळींचा या मासात फारसा प्रतिसाद मिळणार नाही.<br>○ मुलं गणितात अव्वल दर्जावर उत्तीर्ण होतील.<br>• *<u>फ . परदेश गमन</u>*<br>○ उत्तरार्धात परदेश गमन नक्कीच घडणार. एजंट बिझनेस वाढणार.<br>○ फसव्या संधींपासून सावध असावे. |
| **२. ५ सिंहराशी (Simha)**:<br><br> | • *<u>अ. स्वास्थ्य</u>*<br>○ अपघात सारख्या अनपेक्षित घटना पासून वाचावे.<br>○ उत्तरार्धात नाव खराब होऊ नये ही काळजी घ्यावी.<br>○ *पूर्वार्धात उष्णतेचे रोग, ज्वर पासून जपावे. अमावस्या त्रासदायक.*<br>• *<u>ब . नोकरी/धंदा</u>*<br>○ नोकरी छान चालेल.  तरुणांना संधी मिळणार.<br>○ सिनियर मंडळी रेकमेंड करतील. नोकरीत पगार वाढ होईल.<br>• *<u>क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे</u>*<br>○ वैवाहिक जीवन उत्तम चालेल. जोडीदाराची साथ मिळेल.<br>• *<u>ड . वित्त/ गुंतवणुकी</u>*<br>○ जमीनजुमल्यामध्ये गुंतवणूक होईल.<br>○ पूर्वार्धात उगाच भांडण तंटा करू नये. उत्तम संधी गमवाल.<br>○ ताप आला तर त्रास होईल.<br>• *<u>इ . कौटुंबिक</u>*<br>○ मुलं छान कामगिरी करतील. तुम्ही त्यांना प्रोत्साहन देत रहा.<br>○ भाऊ बहीण उत्तम साथ देतील. आईची काळजी घ्याल. |

| | |
|---|---|
| | • *फ. परदेश गमन*<br>  ◦ कन्सल्टंट म्हणून  परदेश गमन नक्कीच होईल. |
| **२. ६ कन्या राशी (Kanya):**<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>  ◦ मधुमेहाचे आणि चरबीचे त्रास वाढतील. वजन कमी करायचा प्रयत्न करावा.<br>  ◦ आजारामुळे रोजचे व्यवहार करायला थोडी अडचण येईल.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>  ◦ पूर्वार्धात नोकरी चैनीची आणि वैयक्तिक फायद्याची असेल. तरुणांना उत्तम काळ.<br>• *क.  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ◦ कौटुंबिक संशय वाढेल. पण मित्र नवा मार्ग दाखवतील.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>  ◦ उत्तरार्धात जमीन जुमल्याच्या खरेदी विक्रीची शक्यता आहे.<br>• *इ. कौटुंबिक*<br>  ◦ आईची काळजी करायची गरज भासणार नाही.<br>  ◦ पूर्वार्धात मुलं पुढाकार घेऊन यश मिळवतील.<br>• *फ. परदेश गमन*<br>  ◦ उत्तरार्धात परदेशात जायची काही शक्यता आहे. |
| **२.७ तूळ राशी (Tula):**<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>  ◦ या मासात स्वास्थ्य उत्तम असेल.<br>  ◦ गुरूच्या कृपेने सर्व ठीक निभावेल.<br>  ◦ डोळ्यांचे आरोग्य वेगळे जपा.<br>  ◦ गरज पडल्यास काळा चष्मा वापरा.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>  ◦ शनीची साथ लाभेल. सर्व कामे तडीस जातील.<br>  ◦ नोकरीत मोठे नाव कमवाल. सर्व एजंटची साथ मिळेल.<br>  ◦ औषधी वनस्पती क्षेत्रामध्ये धंदा उत्तम वाढेल.<br>• *क.  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>  ◦ या मासात कौटुंबिक प्रश्न सुटतील. काही सुवार्ता येतील.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>  ◦ जुन्या घराला डागडुजी करावी लागेल.<br>  ◦ पण या गुंतवणुकीतून मोठा फायदा होईल.<br>  ◦ हा मास वेगाने जाईल, बऱ्याच घटना घडतील.<br>  ◦ पौर्णिमेजवळ पैशाचा पाऊस पडेल. |

| | |
|---|---|
| | • *इ. कौटुंबिक*<br>    • भावंडांचा साथ लाभेल. फॅमिली फंक्शनचा आनंद लुटाल.<br>    • मुलांना परीक्षांमध्ये भरघोस यश मिळेल.<br>    • आई वडिलांची तब्येत उत्तम असेल.<br>• *फ. परदेश गमन*<br>    • परदेशगमनाची तयारी ठेवा. दाट शक्यता आहे. |
| **२. ८ वृश्चिक राशी** (Vrishchika):<br> | • *अ. स्वास्थ्य*<br>    • स्थूलपणाचा थोडा त्रास होईल.<br>    • डोळ्यांची काळजी घ्यावी. डोळे त्रास देतील.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>    • पूर्वार्धात उद्योग धंदा उत्तम चालेल. पुढे थोडं थंड पडेल.<br>    • नोकरीत जम बसवाल.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>    • या मासात कौटुंबिक प्रश्न सुटतील.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>    • जमीन वा शेती विकत घ्याल.<br>    • जंगम मालमत्ता विकत घेण्याचे योग जुळून येतील.<br>    • सध्याच्या शेअर बाजारापुढे तुमच्या गुंतवणूकी फिक्या पडतील.<br>• *इ. कौटुंबिक*<br>    • भावंड व इतर कुटुंबियांबरोबर स्नेह मेळावा होईल.<br>    • मुलांना मार्गदर्शनाची गरज असेल.<br>• *फ. परदेश गमन*<br>    • फारशी आशा ठेऊ नये पण थोडा जोर लावल्यास होईल. |
| **२. ९ धनू राशी(Dhanu):**<br> | • *अ. स्वास्थ्य*<br>    • या मासात उत्तम स्वास्थ्य असणार.<br>• *ब. नोकरी/धंदा*<br>    • पूर्वार्धात ठीक असेल पण उर्वरित भागात मात्र कळी फिरल्यासारखी प्रगती होइल.<br>• *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>    • जोडीदार उत्तम साथ देईल.<br>• *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>    • या महिन्यात छानश्या गुंतवणुकी होतील.<br>• *इ. कौटुंबिक*<br>    • पूर्वार्धात भावंडाना भेटून उत्तम काळ जाईल. |

| | |
|---|---|
| | • उत्तरार्धात आईची साथ मिळेल.<br>• *फ . परदेश गमन*<br>• सुवार्ता येईल अन व्यावसायिक पातळी वर उत्पादन होईल. |
| **२. १० मकर राशी** (Makar):<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>• तीव्र ज्वर आणि भाजणे, कापणे पासून सावध.<br>• वेळच्या वेळी औषधोपचार करावे. अपघात टाळावे.<br>• गरज असल्यास डोळे तपासून घ्यावे.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>• शनीचे मार्गदर्शन असल्यामुळे नोकरीधंदा छान चालेल.<br>• थोडी माघार घ्यावी लागली तर चालेल.<br>• तुम्ही कित्येकांचे गुरुजी असणार. ते सगळे पाठिंबा देतील.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>• पूर्वार्धात कलह असेल.<br>• उत्तरार्ध मात्र प्रणय प्रीतीचा.<br>• *ड . वित्त/ गुंतवणुकी*<br>• शनी दूरदृष्टीने गुंतवणुकी करवतो.<br>• *इ . कौटुंबिक*<br>• आईचे स्वास्थ्य उत्तम असेल.<br>• कौटुंबिक समस्या वा कलह कधी कधी बाहेरचे लोक मिटवतात. त्यातलाच काही प्रकार आढळेल.<br>• *फ . परदेश गमन*<br>• या मासात काही योग दिसत नाही. |
| **२. ११ कुंभ राशी (Kumbha):**<br><br> | • *अ. स्वास्थ्य*<br>• या महिन्यात पूर्वार्धात आरोग्याची काळजी करावी.<br>• उत्तरार्धात बरे वाटेल. पण एप्रिल ग्रहण सांभाळा. दान करा.<br>• अमावस्येला डोळ्यांची काळजी घ्या.<br>• *ब . नोकरी/धंदा*<br>• नोकरीत धंद्यात गल्ल्यावर लक्ष ठेवा.<br>• स्वतंत्र व्यावसायिकास मोठा लाभ होईल.<br>• भागीदारीतील प्रश्न मिटतील.<br>• तरुणांना उत्तम काळ.<br>• *क .  वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे* |

| | |
|---|---|
| | ● जोडीदार पूर्वार्धात खुश करेल.<br>● तरुणांचे लग्न ठरेल.<br>● उत्तरार्धात कलह कमी करा.<br>● *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>● बाजारात धाडसी गुंतवणुकी कराल.<br>● एजन्ट मदत करतील.<br>● भलते सलते व्यवहार करू नका.<br>● *इ. कौटुंबिक*<br>● भावंडांशी उत्तम जमून येईल.<br>● हिशोब चोख ठेवा म्हणजे झाले.<br>● *फ. परदेश गमन*<br>● मोठे बंधू वा गुरूजी परदेशी बोलावतील. नाहीतर फारसे योग नाहीत. |
| **२.१२ मीन राशी (Meena):**<br> | ● *अ. स्वास्थ्य*<br>• पूर्वार्धात स्वास्थ्य सांभाळा.<br>● उत्तरार्धात मात्र तेजस्वी दिसाल.<br>● *ब. नोकरी/धंदा*<br>● गुरुची साथ असेल, नोकरी उत्तम चालेल.<br>● *क. वैवाहिक जीवन व प्रेम प्रकरणे*<br>● मित्राने गूढ परिस्थिती निर्माण केली तरी उत्तरार्धात जोडीदार साथ देईल.<br>● *ड. वित्त/ गुंतवणुकी*<br>● थोडी उधळपट्टी होईल, पण ती आटोक्यात ठेवण्याचा प्रयत्न करा. पुंजीची नासधूस होऊ नये याची काळजी घ्या.<br>● *इ. कौटुंबिक*<br>● भावंडांमध्ये कलह होऊ देऊ नका.<br>● *फ. परदेश गमन*<br>● जुने मित्र परदेशगमनाला मदत करतील. |